**परिपत्रक क्र.५**

संस्था पातळीवर सर्व माध्यमिक विद्यालयांत
**इ.५ वी, इ.८ वी व इ.१० वी उन्हाळी वर्ग**
विनामोबदला राबविणेबाबत :

# रयत शिक्षण संस्था,सातारा.

## कर्मवीर समाधी परिसर, सातारा.

माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग

परिपत्रक क्र. ५ दिनांक १३/४/२०१८

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ----------

संदर्भ :- १) संस्थेकडील दिनांक ५/४/२०१७ चे परिपत्रक क्र.२

माध्यमिक विद्यालयांचा शालान्त परीक्षांचा निकाल सुधारण्यासाठी संस्थेतर्फे नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबविले जात असून, त्यास शिक्षक व विध्यार्थ्यांची साथही लाभत आहे. पर्यायाने शालान्त परीक्षांच्या निकालात सुधारणा होत आहे. याचबरोबर संस्थेच्या विद्यार्थ्यांचा, अभ्यासातील आत्मविश्वास वाढावा, तो सक्षम व्हावा, स्पर्धेच्या युगात त्याची गुणवत्ता वाढावी अशी अपेक्षा आहे.

वरील प्रमाणे संस्थेचा विद्यार्थी सक्षम बनविणे, त्याची गुणवत्ता वाढ करणे व शालान्त परीक्षांचा निकाल उंचावणे या उद्देशाने संस्थेने उन्हाळी सुटटीत इ.५ वी, इ.८ वी व इ.१० वी साठी उन्हाळी वर्ग सुरु केले आहेत. या वर्षापासून
१. इ. ५ वी साठी स्पर्धा परीक्षा (स्कॉलरशिप व नवोदय ) तयारी घेणेसाठी इ.१ ली ते ४ थीच्या अभ्यासक्रम विचारात घेऊन हे
तास घ्यावेत
२. इ. ८ वी साठी स्पर्धा परीक्षा (स्कॉलरशिप व ऑलिंपियाड ) तयारी घेणेसाठी इ.५ वी ते ७ वीच्या व स्कालरशिपच्या अभ्यासक्रमासाठी
आवश्यक घटकाची उजळणी घेणेत यावी.
३. इ.१० वीच्या सर्व विषयांच्या बदललेल्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार इ.१० वी उन्हाळी वर्ग घ्यावेत

१) एखाद्या शाखाप्रमुखास असे उन्हाळी वर्ग सुरु करावयाचे असतील तर त्यांनी प्रथम असे उन्हाळी वर्ग सुरु करण्याचा प्रस्ताव आपल्या विभागाच्या मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठवून सदर वर्ग सुरु करण्यास पूर्व परवानगी घ्यावी व नंतरच वर्ग सुरु करावेत.

२) ज्या शाखांना माध्यमिक विद्यालयांकडील इ.५ वी, इ.८ वी व इ.१० वीच्या वर्गाचे उन्हाळी वर्ग सुरु करावयाचे असतील त्यांनी खालील अटींचे पालन करूनच ते वर्ग सुरु करावेत.

    १) उन्हाळी अगर तत्सम स्वरूपाचे वर्ग चालविताना संबंधित विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचा मोबदला घेता येणार नाही.

    २) विद्यार्थ्यांची संख्यात्मक व गुणात्मक गुणवत्ता व शाखेचा निकाल सुधारण्यासाठी संबंधित शिक्षकांनी इ.५ वी, इ.८ वी व इ.१० वीच्या उन्हाळी वर्गात विद्यार्थ्यांना विनामूल्य अध्यापन करावे.

३.. शाखाप्रमुखांनी असे वर्ग शाखेत सुरु करण्यापूर्वी वर्गात दाखल होऊ इच्छिणारे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि अध्यापनाचे काम करणारे शिक्षक यांची या संदर्भात कसलीही तक्रार नाही अशा आशयाचे संमतीपत्र देणे जरूर आहे. यासाठी सोबत नमुना पाठविला आहे तो तीन प्रतीत भरून त्याची प्रत मा. शिक्षणाधिकारी व दुसरी प्रत संस्थेकडे पाठवावी. व तिसरी प्रत शाखेच्या दप्तरी जपून ठेवावी.

४. १) इ.९ वी उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांचे उन्हाळी सुटटीत वर्ग घेतले जाणार आहेत व त्या कालावधीत शिकविलेला अभ्यासक्रम पुन्हा शिकविला जाणार नाही याची पूर्वकल्पना विद्यार्थ्यांना प्रथम द्यावी.

२) दुसरी सत्र परीक्षा संपल्यानंतर दिनांक १/६/२०१८ ते १४/६/२०१८ पर्यंत (रविवार वगळून) हे वर्ग सुरु करावेत.

५. (अ) उन्हाळी सुट्टीतील वर्गाचा कालावधी १/६/२०१८ ते १४/६/२०१८ अखेर १२ दिवसांचा राहील. झालेल्या अभ्यासक्रमावर जूनमध्ये शाळा सुरु झाल्यानंतर दुस-या दिवसापासून चाचणी सुरु करावी व सलग दोन दिवस घ्यावी.

(१) दररोज प्रत्येक विषयाची ४५ मिनिटांची तासिका घ्यावी.

(२) घंटेचे वेळापत्रक

| ता.क्र. | वेळ |
|---|---|
| १ | ७.३० ते ८.१५ |
| २ | ८.१५ ते ९.०० |
| ३ | ९..०० ते ९.४५ |
| सुट्टी | ९.४५ ते १०.१५ |
| ४ | १०.१५ ते ११.०० |
| ५ | ११.०० ते ११.४५ |
| ६ | ११.४५ ते १२.३० |

६. उन्हाळी वर्गात शिकविलेल्या अभ्यासक्रमाचे पुन्हा अध्यापन करण्यात येऊ नये.

७. अभ्यासक्रमाच्या नियोजनानुसार विज्ञान विषयाचे प्रात्यक्षिकाचे काम प्रयोगशाळेत पूर्ण करावे.

८. प्रयोगशाळेशी संबंधित कर्मचारी प्रात्यक्षिकाच्या कालावधीत विद्यालयात उपस्थित राहतील, असे पाहावे.

९. उन्हाळी वर्ग – अध्यापन व मूल्यमापन एकूण व विषयवार तासिकांचा तपशील खालीलप्रमाणे :

अ) एकूण तासिका :

| अ.नं. | वर्ग | कामाचे दिवस | अध्यापन तासिका प्रत्येक तासिका ४५ मिनिटे १/६/२०१८ ते १४/६/२०१८=१२ दिवस | मूल्यमापन तासिका (जूनमध्ये शाळा सुरु झाल्यानंतर पहिले २ दिवस) |
|---|---|---|---|---|
| १ | उन्हाळी | १२ | १२ X ६ = ७२ | २ X ६ = १२ |

ब ) विषय तासिका

| विषय | शासकीय | उन्हाळी वर्गासाठी | हिवाळी वर्गासाठी |
|---|---|---|---|
| मराठी | ६ | १० | -- |
| हिंदी/संस्कृत/हिंदी + संस्कृत | ६ | १० | -- |
| इंग्रजी | ७ | १२ | -- |
| गणित | ८ | १६ | -- |
| विज्ञान | ८ | १४ | -- |
| सा.शास्त्रे | ६ | १० | -- |
| एकूण | ४१ | **७२** | -- |

१०. मूल्यमापन : उन्हाळी वर्ग चाचणी पहिली

अ) उन्हाळी वर्गाच्या अभ्यासक्रमावर आधारित घ्यावी. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे –

| अ.नं. | दिनांक | विषय | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | सोमवार १८/०६/२०१८ | मराठी | १ तास | २० |
| | | विज्ञान | १ तास | १०+१० =२० |
| | | हिंदी/संस्कृत/हिंदी + संस्कृत | १ तास | २० |
| २ | मंगळवार १९/०६/२०१८ | गणित | १ तास | १०+१०=२० |
| | | इंग्रजी | १ तास | २० |
| | | सा.शास्त्रे | १ तास | १०+१०=२० |

**टीप : आवश्यकता वाटल्यास वरील वेळापत्रकात स्थानिक पातळीवर बदल करण्यास हरकत नाही.**

ब) संबंधित विषय शिक्षकांनी उन्हाळी वर्ग चाचणीची प्रश्नपत्रिका एस.एस.सी. बोर्डाच्या धर्तीवर तयार करावी. शाखाप्रमुखांनी सदर प्रश्नपत्रिकेची एक प्रत आपल्या विभागीय कार्यालयास पाठवावी.

११. शाखाप्रमुखांनी आपल्या शाखेच्या अपेक्षित शालान्त परीक्षा निकालाबाबत जागरूक राहून निकाल उंचावेल याद्दष्टीने आपल्या सहकारी सेवकांच्या सहकार्याने सदरचा प्रकल्प योग्य त-हेने राबवावा.

१२. सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** या संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

अ) वरील सर्व सूचना व अभ्यासक्रम पुस्तिका यांचा अभ्यास करून सदर प्रकल्पाचे योग्य प्रकारे लिखित स्वरुपात नियोजन करावे व त्याची एक प्रत आपल्या विभागीय कार्यालयास पाठवावी.

आ) सदर प्रकल्पाबाबत काही अडचणी आल्यास त्यासंबंधी आपल्या विभागीय कार्यालयाचे मार्गदर्शन घ्यावे. त्यानुसार कार्यवाही करावी.

कळावे.

(श्री.विलास महाडीक)
**सहसचिव(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

(१) सर्व इन्स्पेक्टर्स, रयत शिक्षण संस्था, सातारा.

(२) ऑडिटर रयत शिक्षण संस्था, सातारा.

## 1) विद्यार्थी व पालक यांचेसाठी नमुना फॉर्म

शाखेचे नाव ---------------------------------------------------------------- उन्हाळी वर्गाचा कालावधी---------------------------------

| अ.नं. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | उन्हाळी वर्गास मोबदला न देता स्वेच्छेने येत आहे- विद्यार्थ्याची सही - | पाल्यास सदर वर्गास स्वेच्छेने पाठवीत आहे. असे हमीपत्र भरुन देणाऱ्या पालकाचे नाव | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1)<br>2)<br>3)<br>4) | | | | | | |

शाखाप्रमुखाची सही व शिक्का

## 2) शिक्षकांसाठी नमुना फॉर्म

शाखेचे नाव ----------------------------------------------------------------

| अ. नं. | शिक्षकाचे संपूर्ण नाव | अध्यापनाचा विषय व वर्ग | वर्गाचे काम विना मोबदला व स्वच्छेने करीत आहे. शिक्षकाची सही - | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1)<br>2)<br>3)<br>4) | | | | |

शाखाप्रमुखाची सही व शिक्का